## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १७६/२०२० मधील निशाण १२७ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.५ कलावती शिवाजी शितोळे या दि.०३.०२.२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. परंतु, वादी यांना कायद्यातील तरतूदींचे पुरेसे ज्ञान नसल्यामुळे व दरम्यानचे काळात कोरोना महामारीमुळे कोर्ट कामकाज बंद असल्यामुळे त्यांना मयत प्रतिवादी क्र.५ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. प्रतिवादी यांनी या अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र सादर करुन अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. कायद्याचे ज्ञान प्रत्येक नागरिकास असते, असे जरी गृहितक असले तरी प्रत्येक पक्षकारास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील प्रक्रियेची माहिती नसते, ही बाब नाकारता येणार नाही. वादी यांनी अर्जात केलेली कथने पाहता प्रतिवादी क्र.५ कलावती शिवाजी शितोळे या दि.०३.०२.२०२१ रोजी कोरोना महामारीचे कालावधीमध्ये मयत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे, वादी यांनी त्यांचे अर्जामध्ये दिलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी दावा मिळकतींचे वाटप होऊन मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी हा दावा दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.५ यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे चालू राहते. मयत प्रतिवादी क्र.५ यांना वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ हे वारस असून ते अलहिदा दाव्याचे कामी अभिलेखावर आहेत. त्यामुळे, या कामी प्रतिवादी क्र.५ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी तांत्रिकदृष्ट्या झालेला विलंब माफ होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. वादी यांचा निशाण १२७ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांचेकडून मयत प्रतिवादी क्र.५ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

-

Sd/-

**दिनांक २७.१०.२०२१.** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,विटा,**

**ता. खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS. No.176 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer: S.V. Gaikwad
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 27.10.2021
Order signed by P.O.on : 28.10.2021
Order uploaded on : 29.10.2021